मोटार अपघात प्रकरण क्र. ४२६/२०२२
लखन वि. धोंडिबा
निशाणी क्र. ९

**साक्षीदार क्र.१ लखन सखाराम रगडे यांचा शपथेवर उलटतपास**
**सामनेवाला क्र. २ करीता विधीज्ञ श्री.एस.एम.साळवे**

२. माझे शिक्षण इयत्ता चौथी झालेले आहे. मी सध्या पुणे येथे राहतो. मला सदर अपघाताच्या दिवशी वार कोणता होता हे लक्षात नाही. परंतु अपघात दिनांक २०.०४.२०२२ रोजी झाला. मला तेथुन मालकांनी व मजुरांनी दवाखान्यात नेले. माझी पत्नी त्यावेळी माझे सोबत नव्हती. मला थोडे—थोडे लिहीता वाचता येते. मी कामगार म्हणुन मालक शेळके यांचे कडुन कोणतीही नुकसान भरपाई मागितली नाही. मी मालका विरुध्द कोणतीही कार्यवाही केली नाही. त्या ट्रॅक्टरला एक दोन चाकाची ट्रॉली होती त्यास मराठीत छकडा असे म्हणतात. त्यास नंबर नसतो. सदर ट्रॅक्टरचा मालक साळुंके होते. त्यांचे नांव रंगनाथ की काय होते परंतु मला नेमके माहीत नाही. मला रेणु हॉस्पीटल मध्ये नेले होते. मी डॉक्टरांना ट्रॅक्टरने ॲक्सीडेंट झाला असे सांगितले होते. डॉक्टरांनी त्याची नोंद घेतल्याचे कागदपत्र मी या प्रकरणात दाखल केले असतील. डॉक्टरांनी त्याचा नंबर लिहुन घेतला असेल. मी त्याबाबत डॉक्टर यांचेकडे चौकशी नाही केली. सदरचा कडबा रचत असतांना मी खाली होतो. माझा जबाब पोलीसांनी दिनांक २६.०४.२०२२ रोजी नोंदवला असेल. हे म्हणणे खरे आहे की मी सदर जबाब देतेवेळी **अज्ञात चालकाच्या** विरोधात तक्रार दिली होती. सदरचा ट्रॅक्टर स्वराज ७४४ होता.

३. साईनाथ पंढरीनाथ चव्हाण हा आमच्याच गावचा रहिवाशी आहे व माझे ओळखीचा आहे. साईनाथ यास या दाव्यात का पक्षकार केले नाही याचे कारण मला सांगता येत नाही. माझा अपघात रोडवर साईडला शेतात झाला. माझा अपघात खडकपुरा येथे झाला नाही. सदर अपघात दिनांक **१९.०४.२०२२** रोजी झाला असे घडले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की मला ॲडमीट करीत असतांना माझी पत्नी गंगा दवाखान्यात होती. कृष्णा हा माझा सख्खा भाउ आहे व पंकज हा माझा मावस भाउ आहे. माझे सोबतच्या कामगारांनी वगैरे पोलीस ठाणे येथे जावुन तक्रार दिली नव्हती. संतोष रगडे व

विष्णु आरे हे माझे नातेवाईक आहेत. साक्षीदार सांगतो की ते तिथे कामाला होते. मी माझे कागदपत्रामध्ये जे दोषरोप पत्र दाखल केले आहे त्याचे फेरिस्त सोबत सर्व कागदपत्रे दाखल केले आहे. कृष्णा रगडे व पंकज चांदणे हे माझे नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, साईनाथ पंढरीनाथ चव्हाण हा आमच्या गावचा असल्याने व धोंडीबा यांच्याशी संगणमत करुन सदरचा ट्रॅक्टर या अपघात दाखवला आहे. माझा जबाब सायंकाळी ७.०० ते ०८.०० वाजता घेतला असेल. मला रात्री ०९.३० वाजता डिस्चार्ज दिला. मला दवाखान्यातून डिस्चार्ज मिळेपर्यंत माझेकडे पोलीस जबाब घेण्यासाठी आले नव्हते. डॉक्टरांनी अपघाताबाबत पोलीसांनी माहीती दिली होती.

४. मी एक्सरे, एम.आय.आर ची कागदपत्रे या प्रकरणात का दाखल केली नाही याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी माझे शपथपत्रात मजुरी व उत्पन्नाबाबत खोटे कथन केले आहे. मी माझे अपंगत्वाचे प्रमाणपत्र दाखल केले आहे. ते माझे भावाने आणले होते. हे म्हणणे खरे नाही की माझे भावाने अपंगत्वाचे प्रमाणपत्र कुठल्या हॉस्पीटलमधुन आणले होते हे मला माहीत नाही. साक्षीदार सांगतो की ते त्याने रेणु हॉस्पीटलमधुन आणले होते. अपंगत्वाचे प्रमाणपत्र आणत असतांना माझे तपासण्या किती तारखेला झाल्या हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी ट्रॅक्टरच्या विमा कंपनीकडुन पैसे उकळण्यासाठी साईनाथ व धोंडीबा यांचेशी संगणमत करुन हा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की सदर विमा कंपनी मला कोणतेही नुकसान भरपाई देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे शपथपत्र व खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की मी पोलीसांच्या मदतीने खोटे कागदपत्र तयार केले.

**उलटतपास संपला.**

श्रवणोत्तर स्वीकृती

RENUKA MANIKRAO SATAV

Digitally signed by RENUKA MANIKRAO SATAV
Date: 2026.02.18 17:57:51 +0530

**( रेणूका मा. सातव )**
सदस्य
मोटार अपघात प्राधीकरण, बीड.

दिनांक : १८/०२/२०२६